दिनांक १४.०५.२०२६.

**प्रेस नोट**

लोकसेवक रामप्रसाद ज्ञानबाराव खिल्लारी, वय ४८ वर्षे, पद ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक), ग्रामपंचायत सवना, ता. सेनगाव, जिल्हा हिंगोली, रा. गोरेगाव, तालुका सेनगाव, जि. हिंगोली यांनी ५,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती दिनांक १३.०५.२०२६ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान २,५००/- रूपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन गोरेगाव, ता. सेनगाव, जि. हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

दिनांक १२.०५.२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे नावे घरकुल मंजुर आहे. घरकुलाच्या संयुक्त पाहणी अहवालावर स्वाक्षरी करून अहवाल पंचायत समिती सेनगाव येथे पाठविण्यासाठी लोकसेवक रामप्रसाद ज्ञानबाराव खिल्लारी हे तक्रारदार यांना ५,०००/- रूपये लाचेची मागणी करीत आहे. अशी तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली.

दिनांक १३.०५.२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी करण्याकरीता तक्रारदार यांना पंच क्रमांक १ यांचे सह लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता रवाना केले. सदर ठिकाणी आरोपी लोकसेवक रामप्रसाद ज्ञानबाराव खिल्लारी याने तक्रारदार यांचे घरकुलाचे संयुक्त पाहणी अहवालावर स्वाक्षरी करून, तो पंचायत समिती सेनगाव येथे पाठविणे करीता दोन ते तीन हजार रूपयाची लाचेची मागणी केली. त्यावर पैसे जरा जास्त होतात असे तक्रारदार हे ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) खिल्लारी यांना म्हटल्यावर त्यामध्ये तुम्ही ५०० रूपये कमी द्या असे म्हणुन २,५००/- रूपये पंच क्रमांक १ यांचे समक्ष लाचेची मागणी केल्याचे लाच मागणी पडताळणी कारवाई मध्ये निष्पन्न झाले.

दिनांक १३.०५.२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान अतिथी बार अॅन्ड रेस्टॉरंटचे समोर सेनगाव जाणारे रोडवर, गोरेगाव चौफुली गोरेगाव ता. सेनगाव येथे आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष २५००/- लाचेची रक्कम स्वत: स्विकारली असता, त्यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडण्यात आले असुन आरोपी विरूद्ध पो.स्टे. गोरेगाव गुरनं ९३/२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड परिक्षेत्र नांदेड, श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री राजेश मलपिलु, श्रीमती सुलभा राऊत, सपोउपनि युनुस शेख, विजय शुक्ला, गजानन पवार, रविंद्र वरणे, गोविंद शिंदे, पो.शि./शिवाजी वाघ, विनोद पुंडगे, चापोह/अकबर शेख, सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

मा. संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मोबा. क्रमांक ९५४५५३१२३४/९२२६४८४६९९.
श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली, मोबा. क्रमांक ९८२२२५९९३२
टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६-२२३०५५.
व्हॉटसअॅप क्रमांक :- ९३५९१२८८८९/९४२२०६१०६४.

14/5

( विकास घनवट )
पोलीस उप अधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.

CamScanner